*Ms. Lalita Gandbhir*
*65 Oxford Rd.*
*Newton, MA 02459*
*U.S.A.*

# डिशवॉशर वॉरस्

मी डिशवॉशरमधे वाट्टेल तशा कशाबशा बशा

बोलस्, मगस् भांडी आणि काटेचमचेसुऱ्या

लावते, घालते ठेवते, खुपसते, घुसडते.

बोलस् वायव्य, ईशान्य अशा वेगवेगळ्या

दिशांकडे आ वासून बघत असतात

लहानमोठ्या बशा व मगस् बोलस्च्यामधे कडमडत असतात.

मगस्चे कान पूर्व, पश्चिम असे कुठल्याही दिशेला रोखलेले असतात.

चमचे काटे कधी सरळ तर कधी

खाली डोकं वरती पाय करून उभे असतात

भांड्यांचे दांडे वेडेवाकडे, त्रिकोण, चौकोन अशी प्रमेयं मांडतात.

नवरा हा मी भरलेला डिशवॉशर बघून वैतागतो.

म्हणतो, "तुझ्या ह्या डिशवॉशरमधल्या भांडीबशा

शाळा सुटल्यावर मोकाट धावणाऱ्या मुलांसारख्या उधळल्यात.

प्रत्येक काम करण्याचं एक शास्त्र असतं. समजलीस?"

"हो का?" मी विचारते, "तुझं हे शास्त्र वेदात लिहीलंय?

का अरिस्टॉटलने शिकवलंय? का निचेने सांगितलंय?"

माझ्या उपरोधाकडे दुर्लक्ष करून शांतपणे डिशेस बाहेर काढत नवरा म्हणतो,

"या शास्त्राला कॉमन सेन्स म्हणतात.

जो देव तुला द्यायला विसरलाय."

मग बोलस् खोलगटीनुसार आणि व्यासाप्रमाणे

दक्षिणेला तोंड करून उभे राहातात.

बशा आकाराप्रमाणे बोलस्च्याच दिशेला बघत

उंचीसे एक कतार करतात

सगळ्या मगस्चे कान उत्तरेचा कानोसा घेऊ लागतात

काटेचमचे आपआपल्या कंपूत डोकी वर करून

तर सुऱ्या जड बूड तळाला टेकवून उभ्या राहातात.

भांड्यांचे दांडे आगगाडीच्या रुळाप्रमाणे समांतर रितीने

नैऋत्य दिशा दाखवू लागतात.

मी म्हणते, "तुझा हा डिशवॉशर लष्कराच्या तुकडीप्रमाणे

कवायत करायला सज्ज झालेला दिसतोय."

नवरा हसून म्हणतो, "मी कित्तिदा तुला

डिशवॉशर कसा भरायचा हे शिकवलं.

पण पालथ्या घड्यावर पाणी."

मी म्हणते, "डिशेस् स्वच्छ झाल्या की काम झालं.

माझा आपला उपयुक्तवादी दृष्टीकोन"

नवरा म्हणतो, "उगीच जाडे जाडे शब्द वापरून नॉन सेन्स

बरळयतेस"

डिशवॉशर भरताना, कपाट लावताना

कारने नवी वाट शोधताना आणि अर्थात

मुलांना वळण लावताना

नवऱ्याचा शास्त्रीय कॉमन सेन्स

आणि माझा अशास्त्रीय नॉन सेन्स

यांच्या कलहात

संसाराचं रणांगण झालंय.

परिणामी

लढाई चालू आहे.

\- *ललिता गंडभीर*

*सप्टेंबर १५, २००४*